नागरी बाल विकास केंद्र (UCDC) मधील अतितीव्र कुपोषित (SAM) बालकांना EDNF आहार पुरवठा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२४/प्र.क्र.९२/का.५
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : -७ जानेवारी,२०२५

संदर्भ :- १) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-२०१९/प्र.क्र. १२९/का.५ (E-६९८१२१) दि. ०५.०३.२०२४.

२) महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. एबावि-२०२३/प्र.क्र. १३१/.का.५ दि. ०५.०७.२०२४.

३) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचे पत्र क्र. एबाविसेयो/का-२ / आवपो /EDNF/२०२४-२५/६९७७, दि. २४.१२.२०२४

शासन आदेश :-

राज्यात ग्राम बाल विकास केंद्राच्या धर्तीवर नागरी भागातील अतितीव्र कुपोषित बालकांना (SAM) सर्व साधारण श्रेणीत आणण्याकरीता नागरी बाल विकास केंद्र (UCDC) ही योजना सुरु करण्यास संदर्भाधीन क्र. १ येथील शासन निर्णय दिनांक ०५ मार्च, २०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार नागरी बाल विकास केंद्र कार्यान्वित करुन त्या ठिकाणी अतितीव्र कुपोषित (SAM) बालकांना EDNF आहार पुरवठा करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २४ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावास अनुसरून शासनाच्या दिनांक ०१.१२.२०१६ रोजीच्या खरेदी धोरणामधील अटी व शर्तीचे पालन करण्याच्या अधीन राहून ग्राम बाल विकास केंद्रांतर्गत संबंधित विभागांमध्ये पुरवठा करणा-या EDNF पुरवठाधारकांकडून नागरी बाल विकास केंद्र (UCDC) अंतर्गत EDNF आहार पुरवठा ६ महिने कालावधीकरिता करण्यास परवानगी देण्यात येत आहे. त्यानुसार UCDC तात्काळ कार्यान्वित करून आयुक्तालयाने पुढील कार्यवाही करावी.

२. प्रस्तुत प्रकरणी येणारा खर्च हा मागणी क्र. एक्स-१, २२३६- पोषण आहार, १०१-विशेष पोषन आहार कार्यक्रम, (०९)- अतितीव्र कुपोषित बालकांवर उपचार, (०९)(०१)- ग्राम बाल विकास केंद्र

Scanned with OKEN Scanner

२२३६ १९९२, ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली उपलब्ध करून देण्यात येणा-या तरतुदीमधून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(वि. रा. ठाकूर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना,महाराष्ट्र राज्य, रायगड भवन, नवी मुंबई,

३) सर्व विभागीय उपायुक्त (महिला व बाल विकास),

४) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी(महिला व बाल विकास),जिल्हा परिषद,

५) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी ( ग्रामीण / नागरी / आदिवासी) प्रकल्प,

६) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,

७) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई,

८) महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,

९) महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर,

१०)अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

११)जिल्हा कोषागार अधिकारी,ठाणे

१२)अपर कोषागार अधिकारी, सीबीडी, बेलापूर,नवी मुंबई,

१३)निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई,

१४)निवड नस्ती -का-६.

Scanned with OKEN Scanner